पोलीस अधीक्षक कार्यालय,नाशिक ग्रामीण
पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003
दुरध्वनी नंबर 0253-2309700
E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेस नोट** दिनांक :- ०८/०१/२०२५

**मोहदरी घाटात महिलेची लुटमार करणारे चोरटे १२ तासात जेरबंद**
**स्थानिक गुन्हे शाखा व MIDC सिन्नर पोलीस स्टेशनची कामगिरी**

---

दि. ०७/०१/२०२५ रोजी मध्यरात्रीचे सुमारास तळेगाव दिघे, ता.संगमनेर येथील रहिवासी महिला ही नांदुरशिंगोटे येथे जाण्यासाठी एका पांढ-या रंगाचे पिकअप वाहनास हात दाखवुन नाशिकरोड येथुन प्रवासी म्हणून बसली होती. दरम्यान पिकअप वाहनावरील चालक व गाडीतील एक इसम यांनी नाशिक ते पुणे महामार्गावर मोहदरी घाटामध्ये रोडच्या कडेला पिकअप गाडी थांबवुन, यातील प्रवासी महिलेस चाकुसारखे धारदार शस्त्राचा धाक दाखवुन सोने, चांदीचे दागिने, मोबाईल फोन व बॅग असा एकुण १२,०००/- रूपये किंमतीचा मुद्देमाल जबरीने चोरून, सदर महिलेस गाडीचे खाली उतरून लोटुन देवुन तिस दुखापत झाल्याने MIDC सिन्नर पोलीस ठाणे येथे गुरनं ०६/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०९(४), ३०९(६), ३५१(२), ३(५) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांनी सदर घटनेतील अज्ञात आरोपींचा शोध घेवुन गुन्हा उघडकीस आणणेसाठी स्थानिक गुन्हे शाखा व MIDC सिन्नर पोलीस ठाणेस सुचना दिल्या होत्या. त्यानुसार स्थागुशाचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे व MIDC सिन्नर पो.स्टे. चे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद पाटील यांनी सदर गुन्हयातील फिर्यादी यांचेकडे चौकशी करून, यातील अज्ञात आरोपींनी गुन्हयात वापरलेली पिकअप गाडी, तसेच आरोपींचे वर्णन, अंगावरील पेहराव व बोलीभाषा यावरून सदरचे गुन्हेगार हे सिन्नर शहराचे आसपासचे गावातीलच असल्याचा तर्क लावुन तपास सुरू केला. त्यानुसार खब-यांमार्फत गोपनीय माहिती घेवुन, संशयीत नामे **१) संदिप विठ्ठल वाघ**, वय २८, रा. मापारवाडी, ता.सिन्नर, **२) रोहित मधुकर लहाने**, वय २४, रा. सोनगिरी, ता. सिन्नर यांना ताब्यात घेतले. त्यांना विश्वासात घेवुन वरील गुन्हयाचे अनुषंगाने चौकशी केली असता, त्यांनी दोघांनी मिळुन नाशिकरोड येथुन एका महिलेस त्यांचेकडील पिकअप गाडीमध्ये प्रवासी म्हणुन बसवुन, मोहदरी घाट परिसरात तिस चाकुचा धाक दाखवुन तिचे अंगावरील सोने व चांदीचे दागिने, मोबाईल व बॅग जबरीने चोरी केल्याची कबुली दिली आहे.

सदर आरोपींना वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून त्यांचेकडुन गुन्हयात वापरलेली पिकअप गाडी क्र. एम.एच.१५.जे.सी.८७९१, तसेच जबरीने चोरून नेलेले सोने, चांदीचे दागिने, विवो कंपनीचा मोबाईल फोन असा एकुण ९,०९,०००/- रू.किं.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास MIDC सिन्नर पोलीस ठाणेकडील सपोनि दिपक सुरवाडकर हे करीत आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे, MIDC सिन्नर पो.स्टे. चे पोलीस निरीक्षक श्री. प्रमोद पाटील, स्थागुशाचे सपोनि संदेश पवार, सपोउनि नवनाथ सानप, पोलीस अंमलदार विनोद टिळे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम, रविंद्र गवळी तसेच MIDC सिन्नर पो.स्टे. चे सपोनि दिपक सुरवाडकर, पोउनि किशोर पाटील, पोहवा भगवान शिंदे, योगेश शिंदे, प्रकाश उंबरकर, जयेश खाडे, प्रशांत सहाणे, नितीन काकड यांचे पथकाने वरील आरोपींना ताब्यात घेवुन १२ तासांचे आत सदरचा गुन्हा उघडकीस आणलेला आहे.